CMYK

प्रतापराव जाधव यांनी घेतला आरोग्यसह केंद्र सरकारच्या योजनांचा घेतला आढावा >>पान 2

महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या >>पान 3

वाशिमचा दुहेरी सन्मान! जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांना प्रथम, पोलीस अधीक्षक अनुज तारे यांना द्वितीय राज्यस्तरीय पुरस्कार >>पान 4

**सुविचार**

कठीण प्रसंगात शांत राहा, हेच यशाचे रहस्य आहे.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'तुला ओळखतं कोण?' टोमणा लागला जिव्हारी, सिद्धार्थ जाधवच्या पत्नीने घेतला मोठा निर्णय

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 223 ■ गुरूवार, दि. 27 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# एसटी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : एस टी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरीक इंधनावर परावर्तीत करण्यात येणार आहेत. एसटीच्या बसेस इलेक्ट्रिक आणि एलएनजी इंधनावर सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.**



सदस्य उमा खापरे यांनी पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील प्रदूषणाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये शशिकांत शिंदे, प्रविण दरेकर, अनिल परब, अमित गोरखे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

एसटी महामंडळाकरिता ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यापैकी ४५० बसेस खरेदी केल्या आहेत. तसेच एसटीच्या सध्याच्या बसेस एलएनजीमध्ये परावर्तीत करण्यात येणार असून एलएनजी पुरवठा करण्यासाठी करार करण्यात आला आहे. राज्यात ईव्हीच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ईव्ही धोरण आणले आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर चार्जिंग स्टेशन उभारण्यात येत आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये ३० लाखापेक्षा जास्त किमतीच्या ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर आकारण्याचे जाहीर केले आहे. परंतु हा कर मागे घेण्याची घोषणा सभागृहात करण्यात येणार आहे. राज्यातील रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान ८० टक्के ईव्ही वाहने होतील यादृष्टीने प्रयत्न सुरू आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढला की प्रदूषण कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होईल. तसेच हिंजवडी परिसरातील होणारे प्रदूषण हे मुख्यतः वाहनांमुळे होत असून यासाठी मेट्रो आणि बसेसची कनेक्टिव्हीटी सुरू करण्यात येत आहे. जास्तीत जास्त ईव्ही बसेस घेण्याचा प्रयत्न असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषण मुक्त असावी असे शासनाचे धोरण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रिक करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमदारांनाही देण्यात येणाऱ्या वाहन कर्जावरील व्याज सवलतीही ईव्हीसाठीच देण्यात येतील. सर्व मंत्री यांची वाहनेही ईव्हीमध्ये बदलण्याचे शासनाचे नियोजन असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, रेडीमिक्स प्लांटना पूर्ण अच्छादन करण्याचा नियम शासनाने केला आहे. हिजंवडी परीसरात असलेल्या या रेडीमिक्स प्लांटलाही हा नियम लागू आहे. अशा प्रकारे पूर्ण अच्छादन न करणारे प्रकल्प बंद करण्याची कार्यावाही करण्यात येईल. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेला प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या १७२ कोटी रुपयांच्या निधीच्या विनियोगबाबतही चौकशी करण्यात येईल, अशी माहिती मंत्री पाटील यांनी दिली.

## राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे विधानसभेचे नवे उपाध्यक्ष, देवेंद्र फडणवीसांनी मांडला प्रस्ताव

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी केवळ महायुतीच्यावतीने बनसोडे यांचा अर्ज आला होता. आज दुपारी अर्ज पडताळणीत वैध ठरला आहे. अण्णा बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्ष पदी निवड करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला. त्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनुमोदन दिले आहे. विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी तीन नावे चर्चेत होती. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभा उपाध्यक्षपदी वर्णी लागली आहे. त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.



विधानसभा उपाध्यक्ष पदासाठी पुणे जिल्ह्यातील पिंपरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांचं नाव चर्चेत होतंच मात्र त्यांच्या नावाशिवाय लातूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री संजय बनसोडे, तसेच गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे आमदार राजकुमार बडोले या तिघांची नावं चर्चेत होती. मात्र, अखेर अण्णा बनसोडे विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. अण्णा बनसोडे अजित दादा समर्थक आमदार आहेत. त्याचबरोबर पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत.

अण्णा बनसोडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार आहेत. ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. ते पुणे जिल्ह्यातील पिंपरी विधानसभा मतदारसंघातून आमदारपदी निवडून आले आहेत. २००९ मध्ये पहिल्यांदा आमदारपदी विराजमान झाले होते. त्यानंतर २०१९ आणि २०१४ असे सलग दोनवेळा आमदारकी मिळवली. राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर ते अजित पवार यांच्यासोबत राहिले, आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा त्यांनी बाजी मारली. दादांच्या बालेकिल्ल्याचे पिंपरीचे शिलेदार म्हणून अण्णा बनसोडे यांची ओळख आहे.

## विहीरीत ट्रॅक्टर पडल्याने दोघांचा मृत्यू

### जेसीबीने ट्रॅक्टरसह मृतदेह काढले बाहेर

**दैनिक आपला विदर्भ**

नंदूरबार/प्रतिनिधी : नवापूर तालुक्यात विहिरीच्या खोदकाम सुरू असताना एक भीषण अपघात घडला. खोदकाम करताना अंदाज चुकल्यानं ट्रॅक्टर २० फूट विहिरीत कोसळला. या ट्रॅक्टरखाली दबल्यानं दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. विश्वास जोगु गावीत (वय २३, रा.वागदी, ता.नवापूर) आणि कृष्णा काशिराम गावीत (वय ३३, रा.हळदाणी, ता.नवापूर) अशी मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत.

**अंदाज चुकल्यानं ट्रॅक्टर विहिरीत कोसळला**



नवापूर तालुक्यातील गताडी शिवारातील धरणाजवळ रोजण्या गावीत यांच्या शेतात नवीन विहिरीचं खोदकाम सुरू होतं. या कामासाठी ट्रॅक्टर लावण्यात आले होते. सोमवारी रात्री काम आवरल्यानंतर विश्वास गावीत हा तरुण विहिरीजवळून ट्रॅक्टर घेऊन चालला होता. यावेळी त्याचा मित्र कृष्णा गावीत हा देखील ट्रॅक्टरवर होता. विहिरीजवळून जात असताना अंदाज चुकल्यानं ट्रॅक्टर २० फूट विहिरीत कोसळला. ट्रॅक्टरखाली दबून विश्वास आणि कृष्णा यांचा जागीच मृत्यू झाला.

**जेसीबीच्या सहाय्याने मृतदेह बाहेर काढले**

घटनेची माहिती मिळताच विसरवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र साबळे, हेड कॉन्स्टेबल विजय चौधरी, पोलीस कॉन्स्टेबल लिनेश पाडवी, अनिल राठोड, निखील ठाकरे, राजू कोकणी यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचा आढावा घेत त्यांनी जेसीबीच्या सहाय्याने विहीरीत पडलेला ट्रॅक्टर आणि मृतदेह बाहेर काढला आणि शवविच्छेदनासाठी विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. ही घटना रात्रीच्या वेळी घडल्यानं परिसरात अंधार होता. यावेळी परिसरात शोककळा पसरली. याबाबत विसरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा

# आता भोगवटादार वर्ग २ जमीनींवर तारण कर्ज मिळणार, महसूल विभागाचा मोठा निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील भोगवटादार वर्ग २ च्या जमीनी असणाऱ्या शेतकऱ्यांना आता बँकाकडून कर्ज मिळवण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत. महसूल विभागाने यासंदर्भात मोठा निर्णय घेतला असून राज्यभरातील भोगवटादार वर्ग २ च्या जमिनी असणाऱ्या शेतकऱ्यांना या जमीनींवर तारण कर्ज मिळणार आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने जारी केले असून लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. हा निर्णय कोणत्याही एका बँकेपुरता मर्यादित नसून राज्यातील कोणत्याही बँकेतून कर्ज मिळणं सोपं होणार आहे. यापूर्वी १९९० मध्ये भोगवटादार वर्ग दोनच्या जमीनींबाबत परिपत्रक काढण्यात आले होते. बँकेसह राष्ट्रीयकृत बँकांनाही पीककर्ज, शेती विकासासाठी मध्यम, दीर्घ मुदतीचे कर्ज देता येणार आहे. कर्जासाठी शासन किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीची गरज नाही.

शेतकऱ्यांच्या हितासाठी जिल्हा बँका शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करतात. मात्र, एखादा शेतकरी कर्ज परतफेड करु शकला नाही. तर बँक अडचणीत येते. अशावेळी बँकेने त्याच्याकडून तारण घेतलेली जमीन भोगावटा वर्ग २ असेल तरी त्यावर बोजा चढविता येत नाही असे बँकांचे म्हणणे होते. त्यामुळे भोगवटादार वर्ग २ च्या जमिनी बँकेकडून तारण ठेवल्या जात नव्हत्या. तसेच शेतकऱ्यांना कर्जही मिळत नव्हते. आता जिल्हा बँकांबरोबरच राष्ट्रीयकृत बँकांनाही या जमिनी तारण म्हणून घेता येणार आहेत. याबाबतचे स्मरणपत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आले आहे.



या निर्णयामुळे राज्यातील भोगवटादार वर्ग २ म्हणून जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज मिळविण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत. आता भोगवटादार वर्ग दोनच्या जमीनीवर तारणकर्ज देता येणार आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने जारी केले. सातारा येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अधिकाऱ्यांनी ११ मार्च रोजी भोगवटादार वर्ग २ च्या जमिनीबाबत बैठक घेऊन हा प्रश्न महसूल विभागाच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतलाय. हा निर्णय केवळ एका बँकेपुरता मर्यादित न ठेवता राज्यातील सर्वच भोगवटादार वर्ग २ खातेधारकांची अडचण लक्षात घेऊन त्यांना भोगावटादार वर्ग २ च्या जमीनी बँकेला तारण घेता येणार आहे.

भोगवटा वर्ग दोनच्या जमिनी म्हणजे काय?

ज्या जमिनी खातेदाराला विकण्याचा अधिकार असा खातेदार म्हणजेच भोगवटादार वर्ग २ . भोगवटा वर्ग दोन च्या जमिनींमध्ये. देवस्थानासाठी दिलेल्या इमानी जमीनी, हैद्राबाद अतियात जमिनी, वतन जमीन, वन जमीन, गायरान, पुन पुनर्वसनाच्या जमीनी व शासनाने दिलेल्या जमिनींचा समावेश होतो. अशा जमीनी विक्री साठी शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असते.

## नादुरुस्त रोहित्र ४८ तासात बसवण्याची व्यवस्था - ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**मुंबई/प्रतिनिधी :** नादुरुस्त रोहित बसविण्यासाठी ३० ते ४० दिवसांचा कालावधी लागत असल्याच्या तक्रारी येत आहेत. मात्र नादुरुस्त रोहित्र ४८ तासात बसविण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली असल्याचे ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी विधानसभेत नियम २९३ अन्वये ठरावाला उत्तर देताना सांगितले.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या, राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून राज्यात कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जेचा उपयोग करण्यात येत आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतून १० टक्के अनुदानावर कृषी पंप देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या कुसुम आणि राज्याच्या मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतून २०१५ ते २०२३ पर्यंत १ लाख ८९ हजार ८२० सौर कृषी पंप लावण्यात आले आहे.

राज्यात मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या लाभासाठी १२ लाख शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज केले करण्यात आले आहे.

CMYK

## प्रदूषणाचा भस्मासुर !

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम – २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाबमधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, (राजस्थान – हरियाणा सीमेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर) मुझ्झफरनगर, हनुमानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम–२.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई–दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम – विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

### अरुणाचल प्रदेशातील अतिदुर्गम टाटो गावाला भेट देऊन केंद्रीय मंत्री

# प्रतापराव जाधव यांनी घेतला आरोग्यसह केंद्र सरकारच्या योजनांचा घेतला आढावा







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अतिदुर्गम भागातही आरोग्य सेवा पोहचुन वैद्यकिय सेवेला बळकटी देण्याच काम केंद्र सरकारच्या माध्यमातुन केल्या जात आहे. अशी ग्वाही केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अरुणाचल प्रदेशातील टाटो येथिल ग्रामस्थांशी संवाद साधतांना दिली. भारत चीन सीमारेषेजवळ असलेल्या टाटो या अतिदुर्गम वस्तीला भेट देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रीमंडळातील प्रतापरावजी जाधव हे दुसरे मंत्री आहेत.

अरुणाचल प्रदेशातील डोंगराळ दरीखोऱ्यात वसलेल्या शिओमी जिल्हयातील टाटो येथिल नागरीकांना मिळत असलेल्या मुलभूत सेवेचा आढावा घेण्याच्या दृष्टीकोनातुन पंतप्रधान कार्यालयाच्या सुचनेनुसार केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री यांनी नुकतीच टाटो या गावाला भेट दिली. घनदाट अरण्य, डोंगरदऱ्यांनी वसलेल्या टाटो गावाला जाण्यासाठी हेलिक्रॉप्टरचा पर्याय निवडण्यात आला होता. परंतु उन्हाळयातही तेथे पाऊस पडत असल्याने अखेर आठ तास गाडीने प्रवास करुन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव टाटो या गावी पोहचले. गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देवुन तेथिल आरोग्य सुविधेची माहीती वैद्यकिय कर्मचाऱ्यांशी संवाद साधुन घेतली. त्यानंतर प्रशासिकिय अधिकाऱ्यांसोबत बेठक घेऊन केंद्र सरकारच्या योजनांचा आढावा घेतला. तेथिल शाळांनाही भेट दिली. ग्रामस्थासोबत संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील महायुतीच्या सरकारचे ध्येय समाजातील प्रत्येक घटकाला आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे आहे. आरोग्य सेवेला बळकटी देण्याचे काम केंद्र सरकारच्या वतीने केल्या जात आहे. दर्जेदार वैद्यकिय सुविधा देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहचली किंवा नाही यांचा आढावा घेण्यासाठी आपण येथे आल्याचेही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी ग्रामस्थांशी संवाद साधतांना सांगितले. प्रत्येक गावातील ग्रामस्थांना आरोग्य विषयक सुविधा देण्यासाठी केंद्र सरकार कटीबध्द असल्याचेही त्यांनी सांगितले. टाटो हे गाव भारत चीन सीमारेषेजवळ असुन तेथुन चीन फक्त ३० कि.मी.अंतरावर आहे. या गावाचा यशसवी दौरा करुन गावातील कृषी, आरोग्य, शिक्षण, रोजगार व इतर केद सरकाराच्या योजने संदर्भातील माहीतीचा अहवाल पंतप्रधान कार्यालयास केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कार्यालयामार्फत सुपुर्द करण्यात आला आहे.

## ‘तुला ओळखतं कोण?’ टोमणा लागला जिव्हारी, सिद्धार्थ जाधवच्या पत्नीने घेतला मोठा निर्णय

**मेहकर/प्रतिनिधी :** मराठमोळा अभिनेता सिद्धार्थ जाधव याची पत्नी तृप्ती अक्कलवारने सोशल मीडियावरून ‘जाधव’ हे आडनाव हटवत माहेरचं ‘अक्कलवार’ आडनाव लावलं आहे. यामुळे सोशल मीडियावर अनेक चर्चांना तोंड फुटलं. अशात तिनं स्वतः या निर्णयामागचं कारण उघड केलं आहे.

सिद्धार्थच्या एका वाक्यानं घेतला टर्निंग पॉईंट

तृप्ती अक्कलवार ने ‘बातो बातो में’ या कार्यक्रमात बोलताना आपल्या वैयक्तिक आयुष्यातील भावनिक टप्प्यांचा उल्लेख केला. तृप्ती म्हणाली, २०१३ मध्ये मी नोकरी सोडली आणि सिद्धार्थच्या कामकाजाकडे लक्ष दिलं. आम्ही मिळून एक बीएचके आणि नंतर दोन बीएचके घर घेतलं. पण २०२० मध्ये लॉकडाऊनच्या काळात एका भांडणादरम्यान सिद्धू म्हणाला, ‘तुला कोण ओळखतं? सगळे तुला माझ्यामुळे ओळखतात’ हे ऐकून मला खूप लागलं.

या प्रसंगानंतर तृप्तीने स्वतःची ओळख निर्माण करण्याचा निर्णय घेतला. तिनं घर सांभाळत, मुलींच्या जबाबदाऱ्या पेलत व्यवसाय करण्याचा विचार केला.

‘स्वैरा एंटरप्राइजेस’ ते ‘तृप्ती कॉटेज’

तृप्तीनं कोणतीही मदत न घेता, ‘स्वैरा एंटरप्राइजेस’ नावाने स्वतःची कंपनी सुरू केली. तिने साडी विक्रीपासून ते सलोन, प्रदर्शनं आणि शेवटी अलिबागजवळ ‘तृप्ती कॉटेज’ नावाचं होमस्टे सुरू केलं. मला १९–२० व्या वर्षी बिझनेसवुमन व्हायचं होतं, पण ते स्वप्न त्या वेळी बाजूला ठेवलं होतं. ५० लाखांची गुंतवणूक करून मी हा व्यवसाय सुरू केला, यावर आज कोणी विश्वास ठेवणार नाही, असं तिनं सांगितलं.

या प्रवासानंतर तिनं ठामपणे ठरवलं की, आपल्या व्यवसायासाठी स्वतःचं ‘तृप्ती अक्कलवार’ हे नाव वापरणार. माझी खरी ओळख मी विसरू शकत नाही. म्हणून मी माझं माहेरचं आडनाव पुन्हा वापरलं, असं तिनं स्पष्ट केलं.

सिद्धार्थ जाधवनेदेखील आपल्या इन्स्टाग्रामवर तृप्तीच्या मुलाखतीचा व्हिडीओ शेअर करत तिचं भरभरून कौतुक केलं आहे. तृप्तीला "Strong Woman' म्हणत सिद्धार्थनं तिच्या जिद्दीला सलाम केला. त्यांनी मे २००७ मध्ये प्रेमविवाह केला होता.

## पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील पाच गावांसाठी टँकर मंजूर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील पाच गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये ढासाळवाडी, सैलानी, पिंपळगाव सराई, चौथा व पिंपरखेड या ठिकाणी ठरवून दिल्याप्रमाणे टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली.




ढासाळवाडी गावाला २०५० पशुधन व २५४ लोकसंख्येसाठी एक टँकर ८६ हजार ८८० लिटर्स पाणी पुरवठा करणार आहेत. सैलानी गावाला १५० पशुधन व १००८ लोकसंख्येसाठी एक टँकर २४ हजार ६६० लिटर्स पाणी, पिंपळगाव सराई गावाला ५९२ पशुधन व ५५९२ लोकसंख्येसाठी एक टँकर १ लक्ष १९ हजार ६०० लिटर्स पाणी, चौथा गावाला ४३० पशुधन व १६७८ लोकसंख्येसाठी एक टँकर ७२ हजार १०० लिटर्स व पिंपरखेड गावाला ४५० पशुधन व ८०० लोकसंख्येसाठी एक टँकर २१ हजार ५०० लिटर्स पाणी दररोज टँकरव्दारे पुरवठा करेल.

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता या पाच गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

### चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथे महिला व बाल रुग्णालय मंजूर करण्याबाबत लवकरच निर्णय – सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई/प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी येथे नवीन महिला व बाल रुग्णालय धोरणानुसार प्रस्तावित आहे. हे रुग्णालय मंजूर करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल असे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य समीर कुणावार यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी योगेश सागर, विक्रम पाचपुते, बाळा नर यांनी उपप्रश्न उपस्थित केला. सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी प्रस्तावित बाल रुग्णालय आणि श्रीगोंदा शहरात १०० खाटांचे रुग्णालय यासंदर्भात आराखडा तयार करण्यात आला असून, हा विषय प्राधान्याने सोडविण्यात येणार आहे. राज्यातील प्रस्तावित रुग्णालयाबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल.

# बुलढाणा जिल्हा कारागृहात ‘जिवन गाणे गातच जावे’ सांस्कृतिक कार्यक्रम; बंद्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कारागृहात बंदीस्त असलेल्या बंद्यांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करणे तसेच त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी बुलढाणा जिल्हा कारागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. २५ मार्च रोजी करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत निवडण्यात आलेल्या कलासमुहाचे कलावंतांनी मनोरंजन व प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. त्यानंतर बंद्यांना समुपदेशन व मार्गदर्शनही करण्यात आले.






सांस्कृतिक कार्य विभाग व बुलढाणा जिल्हा कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने जिवन गाणे गातच जावे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्धाटन अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांचे हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. समुपदेशक सतीष बाहेकर व डॉ. महेश बाहेकर यांनी बंद्यांना शारिरीक व मानसिक आरोग्य सदृढ ठेवण्यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन केले. त्यानंतर स्वरश्री इव्हेंटचे तनुश्री भालेराव व त्यांच्या कलावंतानी देशभक्ती, प्रबोधनात्मक व मनोरंजनात्मक गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर केले. सदर गृपमध्ये अकोल्याचे गायक राजू सोनोने, कविता वरगट वादक संच यांनी आपली कला सादर करुन बंद्यांचे मनोरंजन केले. प्रसिध्द निवेदक चंद्रशेखर जोशी यांच्या सुत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत आणली. याप्रसंगी बंद्यांनी देखील आपल्या फर्माईशी पेश करुन प्रतिसाद देत कार्यक्रमाचा आनंद लुटला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन तुरुंगाधिकारी मोहन पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाकरीता सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबईचे समन्वयक महेश इंगळे, सुभेदार बबन खंडारे, हवालदार संजय मदारकर, दिनेश डोंगरदिवे, रविद्र आंधळे, जितेश काळवाघे, चंद्रकांत महाले, राहूल जाधव तसेच सर्व कारागृह अधिकारी कर्मचारी यांनी सहाकार्य केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### वाशिम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी दत्तात्रय भरणे यांची नियुक्ती; वाशिम जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणार-पालकमंत्री दत्तात्रय भरणे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वाशिम जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या नव्या जबाबदारीमुळे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे आभार मानले आहेत. पालकमंत्री पदाची धुरा सांभाळताना वाशिम जिल्ह्याचा सर्वांगीण, समतोल विकास साधणार अशी प्रतिक्रिया मंत्री श्री. भरणे यांनी दिली आहे. वाशिम जिल्हयात शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काटेकोर नियोजन करणार. पायाभूत सुविधा भक्कम करण्याबरोबर लोकप्रतिनिधी, शेतकरी, कष्टकरी, उपेक्षित, महिला, वृद्ध, युवक आदी घटकांचे प्रश्र्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार. विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे, मंत्री श्री. भरणे यांनी स्पष्ट केले आहे.

### स्कार्पिओ व जेसीबीचा अपघात, एक ठार दोन जखमी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** स्कार्पिओ आणि जेसीपीच्या अपघातामध्ये एकाचा मृत्यू तर दोघेजण जखमी झाल्याची घटना दिनांक २५ मार्च रोजी रात्री ७:१५ वाजताच्या दरम्यान रिसोड लोणार मार्गावर चाकोली जवळ शिवनेरी धाब्याजवळ घडली. राजू शामराव डोळे वय ४० वर्ष राहणार पांगरा डोळे तालुका लोणार जिल्हा बुलढाणा असे मृतकाचे नाव असून संतोष पंढरी आंधळे राहणार चाकोली तालुका रिसोड जिल्हा वाशिम असे जखमीचे नाव असून जखमीस रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात भरती केले असता पुढील उपचारार्थ वाशिम येथे रवाना करण्यात आले तर अन्य एक जखमीचा रिसोड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे कळाले मात्र जखमीच्या नावाबद्दल माहिती मिळू शकली नाही. याबाबत माहिती अशी की रिसोड वरून राजू शामराव डोळे आपल्या अन्य दोघांसह स्कार्पिओ मध्ये बसून लोणारच्या दिशेने आपल्या गावाकडे जात होते तर अचानक चाकोली जवळ समोरून येत असलेली जेसीपीला त्यांच्या गाडीची धडक झाली धडक एवढी जबर होती यामध्ये राजू शामराव डोळे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर संतोष आंधळे हे गंभीररित्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच रिसोड पोलीस स्टेशनच्या कर्मचारीनी घटनास्थळी धाव घेतली. राजू डोळे यांचा मृतदेह रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला तर संतोष आंधळे यांना पुढील उपचाराकरिता वाशीम येथे पाठवण्यात आले आहे.

### नागरिकांकडून होणारी पठाणी वसुली थांबवा ; मनसेची जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** ढाकणी नगरपंचायत कडून नागरिकांना कोणत्याही सोयी सुविधा न देता पठाणी वसुली केली जात आहे. या पठाणी वसुलीला तात्काळ थांबवण्याचे आदेश द्यावेत तसेच इतर सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्या, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष देविदास शहाणे व तालुका अधक्ष सादिक शेख यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, गावातील पाणी समस्या लक्षात घेता तात्काळ पाणीपुरवठा करावा विहिरीचे अधिकरण करावे,रस्ते दुरुस्त करावे नगरपंचायत मालमत्ता धारकाना कायदयाना धाक दाखवून पळण हुने त्यांचाचे न.प. कडून नागयेकाला कोणते लाईट, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य मुलभुत सुभिधा देण्यास असमर्थ सात आहे. नगरपंचायत नागरिकांना दहा दिवसाआड पाणी पुरवठा करते. पण कर मात्र ३६५ दिवसाचा घेते. वणी नगरपंचायत ना पाणी पुरवठा करण्याचा स्थता पाईप लाईन आहे. ते त्वरीत चालू करावी, रस्ता अतिशय खराब झाल्याने नागरीकाला त्रास होत आहे. त्यामुळे या रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्यात यावी.वरील मागण्या आठ दिवसाच्या आत मंजूर कराव्या, अन्यथा नगरपंचायत समोर अंदोलन करण्यात येईन व होणाऱ्या अनुचित परिणामास संबंधीत विभाग जबाबदार असेल असेही निवेदनात नमूद केली आहे.निवेदनावर मनसे जिल्हाध्यक्ष देविदास शहाणे, उमरखेड तालुकाध्यक्ष सादिक शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रतिलिपी संबंधित वरिष्ठ विभागांना देण्यात आल्या आहेत.



# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या

## हजारो वंचितच्या कार्यकर्त्यांचा मोर्चा तहसीलवर धडकला

दैनिक आपला विदर्भ

**लोणार : महाबोधी महाविहार बौद्धगया हे पवित्र ठिकाण १९४९ च्या अधिनियमानुसार परधर्मीयांच्या ताब्यात आहे. बोद्ध बांधवांचे धार्मिक,भावनिक आस्था असणारे आणि बुद्धगयाच्या पावन भूमीमध्ये तथागत गौतम बुद्धांना संबोधी प्राप्त झाली या पवित्र भूमीमध्ये चक्रवर्ती अशोक सम्राट यांनी महाबोधी महाविहार २३०० वर्षांपूर्वी निर्माण केले. परंतु १९४९ च्या कायद्यामुळे सदर महाविहार हे परधर्मीयांच्या ताब्यात आहे. यासाठी देशभर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनअतिशय उग्र झालेली आहे. त्याच धर्तीवर लोणार तालुक्यामध्ये भाई महेंद्र पनाड यांच्या नेतृत्वात लोणार बस स्थानकापासून मोर्चा निघाला. या मोर्चामध्ये हजारो समाज बांधव सहभागी झाले होते. महाबोधी महाविहार मुक्त करा...... मुक्त करा.... महाबोधी महाविहार बौद्ध बांधवांच्या ताब्यात द्या.... ताब्यात द्या.... अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण लोणार परिसर दुमदुमला....... मोर्चाचे रूपांतर तहसील कार्यालयावर सभेत झाली.**

यावेळी पवन भाऊ अवसरमोल युवा तालुका महासचिव यांनी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकेमध्ये महाबोधी विहाराचा सखोल इतिहास त्यांनी विशद केला. यानंतर प्रवीण भाऊ अवसरमोल, राहुल अवसरमोल, रुक्मीनाबाई मोरे, मालती ताई कळंबे, जनाताई अंभोरे, उषाताई नरवाडे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर भाई महेंद्र पनाड यांनी उपस्थित सर्व समाज बांधवांना मार्गदर्शन केले. त्यांनी आमच्या मागण्या बिहार सरकारने आणि केंद्र सरकारने तात्काळ मान्य करून अंमलबजावणी केली नाही तर शेवटच्या श्र्वासापर्यंत संघर्ष करत राहू असा शासनाला इशारा दिला. तदनंतर पूज्य भदंत प्रियदर्शी यांनी शील प्रदान केले आणि तहसीलदार लोणार मार्फत सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये बिहार सरकारला निवेदन दिले. शेवटी राष्ट्रगीत गाऊन मोर्चा संपन्न झाला. या



सभेचे बहारदार सूत्रसंचालन सागर पनाड यांनी केले. या मोर्चात सर्व तालुक्यामधील बौद्ध अनुयायी हजारो ने सहभागी झाले होते.

हा ऐतिहासिक मोर्चा यशस्वी करण्यासाठी दिलीप राठोड तालुका अध्यक्ष, पवन अवसरमोल युवा महासचिव, गौतम गवई तालुका युवा अध्यक्ष, अशोक जावळे रिपब्लिकन सेना अध्यक्ष, शिवप्रसाद वाठोरे, सुनील देहाडे, अमित काकडे भीम आर्मी, अमितेश अंभोरे, वैभव मस्के, मंगेश सरदार, नारायण नरवाडे, रमेश प्रधान, नितीन नरवाडे, शुभम अवसरमोल, आकाश मोरे, तुषार अंभोरे, दीपक दत्ता अंभोरे, अशोक सरदार, मेजर सुदेश इंगळे, सरस्वतीबाई इंगळे, शोभाबाई प्रधान व त्यांच्या सहकारी, पंढरी मस्के, विलास चव्हाण, प्रफुल्ल इंगळे, भीमराव इंगळे, नितीन बनसोडे, अशोक कांबळे, विठ्ठल लांडगे, सतीश लांडगे, भीमराव वाठोरे, श्रीराम पनाड, डी के पनाड, अशोक पनाड, रमेश पनाड, मनोहर पनाड, अरुण पनाड,गयाबाई सदावर्ते, किशोर मोरे, ऋषिकेश अवसरमोल, नर्मदाबाई अवसरमोल, नमो अवसरमोल, मिलिंद मोरे, भीमराव जाधव, शोभाबाई जाधव, प्रल्हाद सरदार, दीपक मोरे, संजय मोरे, सागरबाई चाटशे, संबोधी महिला मंडळ लोणार, प्रताप अवसारमोल व त्यांचे सर्व सहकारी, कैलास वानखेडे, भाऊराव पंडागळे, देवानंद नरवाडे, बालाजी नरवाडे, भारत साळवे, संदीप सदावर्ते, राजेंद्र सदावर्ते, रमेश इंगळे, बाळू वानखेडे, दिलीप पगारे , सुशील आनंदराव यांच्यासह हजारो बौद्ध बांधव उपस्थित होते.

## क्षय आरोग्य धाम येथे जागतिक क्षयरोग दिन साजरा; तज्ज्ञांव्दारे क्षयरुग्णांना मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्षय बाधित रुग्णांमध्ये क्षय रोगाबद्दल जागरुकता निर्माण होण्यासाठी जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्याने येथील क्षय आरोग्यधाम येथे क्षयरोग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तज्ज्ञांव्दारे क्षयरोग बांधित रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले.



क्षयरोगाबाबत समाजामध्ये जागरुकता निर्माण व्हावी, तसेच क्षय रोगाच्या समूळ उच्चाटनासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना गती देण्यासाठी १९८२ पासून दरवर्षी २४ मार्च रोजी जागतिक क्षय दिन साजरा केला जातो. क्षयरोग हा साथीचा रोग आहे, ज्यामुळे दरवर्षी सुमारे दीड दशलक्ष लोक मृत्युमुखी पडत असतात. क्षय रोगाचे समूळ उच्चाटन व्हावे या उद्देशाने हा दिवस साजरा करण्यासाठी दरवर्षी वेगवेगळी राबविण्यात येतात. २०२५ या वर्षासाठी होय आपण क्षयरोगाचा अंत करू शकतो! वचनबद्ध व्हा! गुंतवणूक करा व वितरित करा! अशी थीम ठेवण्यात आली आहे. ही थीम आशा, निकड आणि जबाबदारीचा एक शक्तिशाली सामूहिक संदेश देते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन डॉ. रॉबर्ट कोच यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. रुग्णालयातील आहार तज्ञ डॉ. मयुरी चौधरी (देशमुख) यांनी क्षयरोग बाधित रुग्णांनी आहार संदर्भात घ्यावयाची काळजी व अतिप्रथिनायुक्त आहाराचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. तायडे यांनी क्षयरोग रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी घ्यावयाची काळजी यासंदर्भात मार्गदर्शन केले. तसेच क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमासंदर्भात वैद्यकीय अधिकारी डॉ. खान यांनी सर्व रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना माहिती दिली.

वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद कोठारी यांनी क्षयरोगाचे समूळ उच्चाटनाकरिता केल्या जाणाऱ्या अनेकविध प्रयत्नांपैकी जागरुकता बाळगून तात्काळ केल्या जाणाऱ्या उपाययोजना आणि जागरूक नागरिक बनून लक्षणानुसार केल्या जाणाऱ्या आरोग्य चाचण्यावर भर दिला. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुशील चव्हाण यांनी अध्यक्षिय समारोपामध्ये क्षयरोगाच्या समूळ उच्चाटनासाठी सरकारच्या विविध उपयोजना तसेच क्षयरोग बाधित व्यक्तीसाठी विविध स्तरांवरून घेतल्या जाणाऱ्या काळजी संदर्भात बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अधिपरिचारिका कालींदा जायभाय यांनी केले.

## आदिवासी सुशिक्षित उमेदवारांना विनामुल्य स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आदिवासी उमेदवारांकरीता परतवाडा (जि. अमरावती) येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राकडून विविध पदासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेची विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी इच्छूकांनी दि. २७ मार्च २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशिक्षण कालावधी दि. १ एप्रिल ते १५ जुलै २०२५ पर्यंत असा साडेतीन महिन्यांचा असून या कालावधीत प्रशिक्षणार्थींना दरमहा एक हजार रूपये विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर स्पर्धापरीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विविध विषयांच्या चार पुस्तकांचा संच विनामूल्य देण्यात येतो.

प्रशिक्षणासाठी पात्रता : उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा. किमान वय १८ ते ३० चे दरम्यान असावे, उमेदवार किमान एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण असावा, रोजगार मार्गदर्शन केंद्र कार्यालयात नोंदणी केलेली असावा. आवश्यक कागदपत्र : शाळा सोडल्याचा दाखला, उपविभागीय अधिकारीयांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, एस.एस.सी. उत्तीर्णची गुणपत्रिका, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नोंदणी प्रमाणपत्र व उमेदवाराचा पासपोर्ट फोटो.

अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील आदिवासी उमेदवारांनी अर्ज आदिवासी उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, अचलपुर कॅम्प, परतवाडा. ता अचलपूर. जि.अमरावती या ठिकाणी उमेदवार निवडीसाठी २८ मार्च रोजी १२ वाजता मुलाखत होणार आहे. यासाठी मुलाखतीस मुळ कागदपत्रासह उमेदवारांनी उपस्थित राहावे. तसेच निवड यादी त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता कार्यालयीन सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. अधिक माहितीसाठी ०७२२३-२२१२०५ किंवा ७७०९४३२०२४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# मिनी मंत्रालयाचा ३६ कोटीचा अर्थसंकल्प मंजूर

**प्रगत तंत्रज्ञान सक्षम समाज व शाश्वत ग्रामविकासाची संकल्पना**





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलडाणा जिल्हा परिषदेच्या २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ३६ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आज मंजूर करण्यात आले आहेत. सदर अर्थसंकल्प प्रगत तंत्रज्ञान, सक्षम समाज व शाश्र्वत ग्रामविकास या मुख्य संकल्पनेवर आधारीत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी सांगितले.

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ६३ लाख ३ हजार ७२९ रुपयांच्या शिल्लकी अंदाजपत्रकास मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अर्थसंकल्पीय बैठकीत मान्यता देण्यात आली. जिल्हा परिषदेची स्वउत्पन्ना पोटी आरंभीच्या शिल्लकेसह एकुण महसुली जमा ३६ कोटी ७९ लाख ३१ हजार ७२९ रुपये आहे. तर प्रस्तावित खर्च ३६ कोटी १६ लाक्ष २८ हजार रुपये खर्च आहे. २०२५-२६ च्या स्वनिधी मुळ अर्थसंकल्पात इतर योजनासह वैशिष्ट्यपुर्ण योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

**खर्चाची तरतुद याप्रमाणे (आकडे रुपयात) :** बांधकाम विभाग ६ कोटी ९५ लक्ष ६५ हजार, शिक्षण विभाग ४ कोटी ९९ लक्ष ८ हजार, आरोग्य विभाग १ कोटी १ लक्ष ४ हजार, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ३ कोटी ८५ लक्ष २ हजार, समाजकल्याण विभाग ३ कोटी ३२ लक्ष ७ हजार, महिला व बालकल्याण विभाग १ कोटी ८७ लक्ष १२ हजार, कृषी विभाग ८७ लक्ष ६५ हजार, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभाग १ कोटी ४३ लक्ष ५ हजार, पंचायतराज कार्यक्रम विभाग ९ कोटी ८४ लक्ष ५९ हजार, लघुपाटबंधारे विभाग २ कोटी, १ लक्ष १ हजार असे एकुण खर्च प्रस्तावित ३६ कोटी १६ लक्ष २८ हजार रुपये.

**रुपया कसा येणार (टक्केवारी) :** मुद्रांक व नोदणी शुल्क ४५.०७ टक्के, सेवा कर ७.२९ टक्के, विक्रीय वस्तु व सेवा व्याज ३९.३० टक्के, सार्वजनिक मालमत्तेचे परिरक्षण ६.०८ टक्के, इतर संकीर्ण २.२६ टक्के. रुपया कसा खर्च होणार (टक्केवारी) : बांधकाम विभाग १९.२३ टक्के, शिक्षण विभाग १३.८० टक्के, आरोग्य विभाग २.७९ टक्के, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग १०.६४ टक्के, समाजकल्याण विभाग ९.१८ टक्के, महिला व बालकल्याण विभाग ५.१७ टक्के, कृषी विभाग २.४२ टक्के, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभाग ३.९५ टक्के, पंचायतराज कार्यक्रम विभाग २७.२७ टक्के, लघुपाटबंधारे विभाग ५.५५ टक्के.

१.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संकल्पनेतुन शिक्षण विभागाअंतर्गत गरीब होतकरु गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांकरीता मोफत छएएढ, गएए व उएढ चे कोचिंगसाठी भरीव तरतुद करण्यात आली आहे. २. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शना मध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी व्याज उत्पन्ना अंतर्गत गेल्या ५ ते ७ वर्षाच्या व्याजउत्पन्नाचे तुलनेत ३ पटीने वाढ करुन व्याज उत्पन्न मिळविले आहे. ३. समाजकल्याण अंतर्गत मागासवर्गीयांसाठी वैयक्तिक व वस्तीसुधार व प्रशिक्षणाअंतर्गत २० % राखीव तरतुद तसेच ग्रामीण भागातील महिलांसाठी १० टक्के वैयक्तिक योजना, प्रशिक्षण व इतर बाबींवर भरीव तरतुद करण्यात आली आहे. ५ टक्के दिव्यांगाअंतर्गत दिव्यांगाच्या विकासाच्या दृष्टीने सुध्दा भरीव तरतुद केली आहे. ४. शेतकऱ्यांसाठी ७५ टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील शेतक-यांसाठी ट्रॅक्टर व इतर साहित्य अनुदानासाठी भरीव तरतुद. ५. पशुसंवर्धन विभाग अंतर्गत पशुधन व महिष योजना विकसित करण्यासाठी खास बाब म्हणून भरीव तरतूद केली असुन गुरांसाठी सुध्दा औषधोपचारासाठी तरतुद केली आहे. ६. बांधकाम विभागाअंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते व नाली पुल इ. नवीन बांधकामे व दुरुस्ती बाबत भरीव तरतुद.

७. सिंचन विभागांअंतर्गत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी नदीवरील पाणी अडविण्यासाठी वर्ग योजना तसेच नवीन बंधाऱ्यासाठी सुध्दा उपाययोजना केलेल्या आहेत.

सर्व घटकांवर लक्ष केंद्रीत करुन ग्रामीण भागातील सर्व गरीब व गरजू शेतकरी व कष्टकरी जनता यांचे हित लक्षात ठेवून जिल्हा परिषदेने सदर अर्थसंकल्प मंजुर केलेला आहे, अशी माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविली आहे.

# वाशिमचा दुहेरी सन्मान! जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांना प्रथम, पोलीस अधीक्षक अनुज तारे यांना द्वितीय राज्यस्तरीय पुरस्कार

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२४-२०२५




दैनिक आपला विदर्भ

**वाशीम:/प्रतिनिधी : जिल्ह्यासाठी आजचा दिवस अभिमानाचा ठरला आहे! महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२४-२०२५ अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा झाली असून जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या नेतृत्वाखाली उल्लेखनीय कामगिरी बजावली गेली आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी 'मिशन डबलिंग फार्मर्स इन्कम' या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावला असून, त्यांना ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे, तर जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी कार्यालयीन व्यवस्थापन, अभिलेख कक्ष सुधारणा आणि पोलीस कल्याणकारी योजनांसाठी राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार मिळवला आहे.**

**शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी 'मिशन डबलिंग फार्मर्स इन्कम'**

जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन चिया सीडच्या उत्पादनाचा नाविन्यपूर्ण प्रयोग, नरेगा योजनेतून सिंचन विहिरींची निर्मिती आणि सेंद्रिय तसेच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यावर विशेष भर दिला. या प्रभावी उपाययोजनांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आली असून, वाशिम जिल्ह्याने राज्यभरात आपली छाप उमटवली आहे.

**पोलीस अधीक्षकांचाही सन्मान**

वाशिमचे पोलीस अधीक्षक अनुज तारे यांनी कार्यालयीन व्यवस्थापन, अभिलेख कक्षाची सुधारणा आणि पोलीस कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार मिळवला आहे. त्यांना ६ लाख रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले असून, ही रक्कम कार्यालयीन सुधारणा आणि नव्या प्रकल्पांसाठी वापरली जाणार आहे. या यशाने पोलीस दलाच्या समर्पणाचेही कौतुक झाले आहे. जिल्ह्याचा गौरव या दुहेरी यशामुळे जिल्हा राज्याच्या नकाशावर झळकला आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. आणि पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने दाखवलेली कार्यक्षमता आणि लोककल्याणकारी दृष्टिकोन यामुळे वाशिमवासीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या यशात उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) कैलास देवरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे आणि गटविकास अधिकारी रविंद्र सोनुने यांच्या उल्लेखनीय कार्याचा आणि सहकार्याचा मोलाचा वाटा आहे. या सर्वांचे जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी विशेष अभिनंदन केले आहे. हे यश जिल्ह्याच्या प्रगतीचा पाया मजबूत करणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत आदी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### मोठेगांव येथे घराला आग मोठा अनर्थ टळला



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील मोठेगांव येथे दि.२५ मार्च रोजी दुपारी २. ३० च्या दरम्यान अचानक मोठी आग लागली होती. गांवातील गढी वर असलेल्या व अंरविदराव गणेशराव देशमुख व त्यांच्या भांवडाच्या मालकीची असलेल्या जुन्या माडीला अच्यानक आग लागली होती आग हि सुरवातीला माडीच्या खाली लागली होती व बघता बघता हि आग लाकडी खांब असल्यामुळे माडीवर आग वर चडली व आगीने पेट घेतला.सदर माडी हि मानव विरहित असल्यामुळे खुप मोठा अनर्थ टळला. आजु बाजुला भरपुर प्रमानात जनावराचा चारा होता परंतु गांवातील काही नागरिकानी मोटरपंपच्या साह्यानी पाणी टाकले. सदरबाब सामाजिक कार्यकर्तो मनोजभाऊ देशमुख यांना माहिती मिळाल्या नतंर ते लगेच घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी परिस्थीती लक्षात घेता लगेच रिसोड अग्निशमन दलाला माहिति दिली व अग्णीशामक दला चे वाहक अझरुद्दीन व कर्मचारी संजीव पवार यांनी तातडीने घटनास्थळ गाठून शेवटी आग आटोक्यात आणली. सदर आग विझवण्यासाठी अनिकेत बालासाहेब देशमुख,अभिजीत समाधानराव देशमुख,अजय गोपालराव देशमुख,अजय झनकराव देशमुख,भरत दत्तराव देशमुख,महेश केशवराव देशमुख,ज्ञानेश्र्वर विठ्ठलराव देशमुख,पवन गणेशराव देशमुख,जगदिश अंरविदराव देशमुख, किशोर अंरविदराव देशमुख, वैभव भिकंनराव देशमुख,विठ्ठल आंनदा कष्टे, एकनाथ आंनदा कष्टे, अणिल प्रभतराव देशमुख आदीनी परिश्रम घेतले व आगिवर नियंत्रित आणले.

### खडकपुर्णा नदीच्या पुलावरील जड वाहतुक पर्यायी मार्गाने वळविली; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ वरील राहेरी बु. गावाजवळील खडकपुर्णा नदीच्या पुलाचे दुरुस्तीचे काम सुरु आहे. या पुलावर मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होऊ नये, याकरीता खडकपुर्णा नदीच्या पुलावरील काम पुर्ण होईपर्यंत जडवाहणाची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

आदेशात नमूद केल्याप्रमाणे जालना-सिंदखेडराजा-किनगांवराजा-सुलतानपुर-मेहकर-मालेगांव या मार्गावरील वाहतूक जालना-देऊळगांवराजा-चिखली-मेहकर-मालेगांव या पर्यायी मार्गाने. तसेच मालेगांव-मेहकर-सुलतानपूर-किनगांवराजा-सिंदखेडराजा-जालना या मार्गावरील वाहतुक मालेगांव-मेहकर-चिखली-देऊळगावंराजा-जालना या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. सदर आदेशाचे उल्लंघन केल्याचे निर्देशनास आल्यास मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३१ अन्वये कारवाई करण्यात येईल.

### 'बाल आशीर्वाद' नावाची योजना केवळ अफवा; जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महिला व बाल विकास विभागाकडून 'मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना' अशा नावाने कोणतीही योजना अस्तित्वात नसून, हा संदेश केवळ अफवा आहे. त्यामुळे त्यावर विश्र्वास ठेवून आर्थिक नुकसान होणार नाही, याबाबत दक्षता बाळगावी. अशा अफवा असलेल्या सोशल मीडिया पोस्टवर विश्र्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

'मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना' अशी योजना असल्याचे भासवून समाजमाध्यमांद्वारे काही संदेश प्रसारित होत आहेत. असे वृत्त केवळ अफवा असून, नागरिकांनी त्यावर विश्र्वास ठेवू नये व फसवणुकीला बळी पडू नये. या प्रकारच्या फसव्या संदेशांमध्ये दि. १ मार्च २०२० नंतर दोन्ही पालक अथवा एक पालक मृत्यू झाला आहे व बालकांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील २ मुलांना बाल सेवा योजनेत दरमहा ४ हजार रुपये मिळणार आहेत व त्याचे फॉर्म तहसील कार्यालयात उपलब्ध आहेत. सदर अर्ज भरून जिल्हा बाल संरक्षण कक्ष/ जिल्हा परिवीक्षा अधिकारी यांच्याकडे सादर करावे, असा मजकूर प्रसारित करण्यात येत आहे.

## दिव्यांग व्यक्तींसाठी द्रोण पत्रावळी मशिन; शुक्रवारी होणार लाभार्थ्यांची निवड

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दिव्यांग व्यक्तीचे जीवनमान उंचावण्याकरिता जिल्हा परिषदच्या समाजकल्याण विभागामार्फत सन २०२४-२५ साठी द्रोण पत्रावळी बनविण्याचे मशीन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची ईश्र्वरचिठ्ठीव्दारे निवड करण्यात येणार आहे. तरी संबधित दिव्यांग बांधवानी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कक्षात दि. २८ मार्च २०२५ रोजी दुपारी १ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## वाहनाच्या धडकेत हरीण गंभीर जखमी

### वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना करण्यात आले पाचारण



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा ते जळगाव जामोद या मार्गावर आज सकाळी अज्ञात वाहनाने एका हरणीला जबर धडक दिली यामध्ये हरीनीचे दोन्ही पाय निकामी झाली. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांनी हरिनाला उचलून बाजूला ठेवून शिवाजी पेसोडे यांनी याबाबतची माहिती परिसरातील वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिली. काही वेळानंतर अधिकारी पोहोचल्यानंतर सदर हरिनाला रुग्णालयात हलविण्यात आले.

## अखेर जिल्ह्यातील अवैद्य धंदे बंद

■ आझाद हिंदच्या रणरागिन्यांचा इन्कलाब बुलंद

■ १० मागण्या पूर्ण झाल्याचे पत्र




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अवैध्य धंदे बंद करण्याचे नुकतेच गोपनीय आदेश पोलीस प्रशासनाकडून अवैध व्यवसायिकांना मिळाले असून तत्काळ अनधिकृत वरली मटक्याचे दुकाने बंद झाले आहे. अवैद्य धंदे बंद करावे,आमरण उपोषणाची जागा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर देण्यात यावी या प्रमुख मागण्यांसह ११ जिल्ह्यातील नागरी ज्वलंत समस्या घेऊन सुरू असलेल्या आमरण उपोषणाच्या मागणीतील अवैद्य धंदे बंद करण्याची प्रमुख मागणी उपोषणाच्या सातव्या दिवशी अखेर पूर्ण झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे यांची गाडी अडवून काळे झेंडे दाखवील्यामुळे पोलीस प्रशासनाकडून अवैध धंद्यांना बंद करण्याचे आदेश निघाले .अवघ्या एका तासात जिल्ह्यातील सर्व अवैद्य धंदे बंद झाले आहे. अखेर आझाद हिंद रणरागिन्यांचा हा मोठा विजय असून २२ मार्चपासून आझाद हिंद महिला संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष पंचफुलाबाई गवई ह्या आमरण उपोषण बसल्या सदर आंदोलनाची जिल्हा प्रशासनाने थट्टा उडविण्याचा प्रकार सुरू केल्यामुळे आझाद हिंद झाली. उपोषणाच्या सातव्या दिवशी आंदोलनाची यशस्वि होत असल्याचे एकंदरीत चित्र समोर येत आहे. अद्याप उपोषण सुरू पासून आमरण उपोषण आंदोलनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील जागा मिळावी ही प्रमुख मागणी अद्याप बाकी असल्यामुळे आमरण उपोषण आंदोलनाचा एल्गार अद्याप सुरूच आहे.

## कामरगाव येथे भव्य पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळावा - २८ मार्चला आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी : जिल्हा परिषद, वाशिम व पंचायत समिती, कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. २८ मार्च २०२५ रोजी शेतकरी भवन, कृषी उत्पन्न बाजार समिती, कामरगाव येथे पार पडणार आहे.**

पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती कारंजा यांच्या वतीने आयोजित या प्रदर्शनात विविध गटातील उत्कृष्ट पशुधनाचे प्रदर्शन होणार असून, उत्कृष्ट ठरणाऱ्या पशुधारकांना बक्षिसे आणि प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपल्या उत्तम गुणवत्तेच्या पशुधनासह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### कार्यक्रमाचे वेळापत्रक

जनावरांची नोंदणी: सकाळी ९ ते १०

पशुपालन मार्गदर्शन: सकाळी १०.३० ते २.००

बक्षीस वितरण: दुपारी २. ते ८

समारोप: रात्री ८

### महत्त्वाची सूचना

सर्व विजेत्यांना बक्षिसे RTGS द्वारे थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत. त्यामुळे नोंदणी करताना आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स आणि मोबाइल क्रमांक सोबत आणावा.

### अधिक माहितीसाठी संपर्क

सर्व पशुवैद्यकीय दवाखाने व पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती कारंजा. असे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांनी कळविले आहे.

### प्रदर्शनातील विजेत्यांसाठी बक्षिसे (रुपयांत)

| | | | |
|---|---|---|---|
| संकरित गायी | प्रथम ५००० | द्वितीय ३००० | तृतीय २००० |
| देशी गायी | प्रथम ५००० | द्वितीय ३००० | तृतीय २००० |
| म्हैस वर्ग | प्रथम ५००० | द्वितीय ३००० | तृतीय २००० |
| बैल जोडी | प्रथम ५००० | द्वितीय ३००० | तृतीय २००० |
| शेळी गट | प्रथम ३००० | द्वितीय २००० | तृतीय २००० |
| अश्व गट | प्रथम ३००० | द्वितीय २००० | तृतीय २००० |
| श्वान गट | प्रथम ३००० | द्वितीय २००० | तृतीय २००० |

